ePaper
‖ वर्ष - 7 । अंक - 330 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com ‖ शनिवार, दिनांक 20 एप्रिल 2024 ‖ पिंपरी-चिंचवड आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews

## सातार्‍यात उदयनराजे, शशिकांत शिंदेसह 33 उमेदवारी अर्ज दाखल



### आतील पानांत


- राहुल-क्विंटन चेन्नईला पडले भारी
- जान्हवी कपूरचा 'उलझ'
- निवडणुकीचे पावित्र्य टिकावे!
- निलेश लंके यांना उमेदवारी देऊ नये


## रक्ताची नाती एकमेकांविरोधात

# अजितदादांविरोधात 'एकजुटीची चौकट'!

### »रोहित पवारांचे लक्षवेधी ट्विट, अजित पवार यांच्या फुटीचा कुटुंबावरही परिणाम

। बारामती । महाईन्यूज

**बारामती लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराची सुरूवात आज बारामती तालुक्यातील कन्हेरी येथून करण्यात आली. यावेळी संपूर्ण पवार कुटुंब उपस्थित होते. या सभेनंतर आमदार रोहित पवार यांनी शरद पवारांना बिलगून बसलेल्या सुप्रिया सुळे व त्यांच्यासमोर युगेंद्र पवार व रोहित पवार हे दोन नातू अशा स्वरूपाचे एक छायाचित्र प्रसिद्ध केलं आणि 'एकजुटीची चौकट' असे कॅप्शन देऊन ते छायाचित्र समाजमाध्यमांत प्रसिद्ध केले.**





आतापर्यंत दिवाळी सणाच्यावेळी एकत्र येणारे पवार कुटुंब महाराष्ट्राला माहिती होते. पवार कुटुंबातले सदस्य जगात कुठेही असले तरी दिवाळीच्या निमित्ताने सगळे एकत्र येतात, हा वर्षानुवर्षांचा प्रघात आहे. परंतु अजित पवार यांच्या फुटीचा कुटुंबावरही परिणाम झाला असून रक्ताची नाती एकमेकांविरोधात उभी ठाकली आहेत.

कालपर्यंत बहिणीसाठी मते मागणारे अजित पवार आज 'सुप्रियाने केलेले एक कामा सांगा, तिच्यापेक्षा नवा खासदार चांगले काम करेल', असे सांगून सुप्रिया सुळे यांच्या पराभवासाठी सरसावले आहेत. सुनेत्रा पवार या बारामती लोकसभेच्या रिंगणात आहेत. त्यांच्या प्रचारासाठी अजित पवार दिवसरात्र एक करत आहेत. अशा परिस्थितीत रोहित पवार यांनी प्रसिद्ध केलेल्या फोटोत अजित पवार यापुढे नसतील, मात्र वरील तिघेजण आणि नव्याने युगेंद्र पवार हा नातू छायाचित्रात आणि कायम सोबतीला असेल, अशाच स्वरूपाचे संकेत यानिमित्ताने दिले आहेत आणि नव्याने घडणाऱ्या घडामोडींमध्ये ही नवीन चौकट अभेद्य असेल, असे रोहित पवारांनी या निमित्ताने सुचविले आहे.

आज युगेंद्र पवारांचं शरद पवार आणि सुप्रिया सुळेंसमोर पहिलंच भाषण, आधीच मागितली माफी १९६७ साली पहिल्यांदा, १९७१ साली निवडणूक झाली तेव्हा, १९८०, १९८५, १९९०, १९९५, २००० आत्तापर्यंत इतक्यांदा आलो.

### कन्हेरीच्या मारुतीरायाला नारळ वाढवून प्रचार

**»एक काळ असा होता की आजूबाजूला माळरान होतं आणि त्या माळरानामध्ये गवता शिवाय दुसरं काही नसायचं. छोटे मोठे आपण कार्यक्रम हातात घेतले, परवानग्या दिल्या. तुम्हा लोकांनी कष्ट केले आणि आता येताना रस्त्यामध्ये उसाचे परिसर दिसतात. या सगळ्या मंडळींनी हनुमान रायाची सेवा केली. हजारोंच्या संख्येने या ठिकाणी येऊन आपल्या अंतःकरणाची श्रद्धा या ठिकाणी अर्पण करतात. कधी नारळ फोडायला आलो होतो मी?**

## पुणे जिल्ह्यात शिरूरच्या मतदारांचा दबदबा

### »तीन मतदारसंघांतील अर्ज भरण्याची अंतिम मुदत 25 एप्रिलपर्यंत

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

पुणे जिल्ह्यातील बारामती लोकसभा मतदारसंघ वगळता अन्य तीन मतदारसंघांतील उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बारामती मतदारसंघाची अर्ज भरण्याची मुदत शुक्रवारी संपुष्टात आली, तर अन्य तीन मतदारसंघांतील अर्ज भरण्याची अंतिम मुदत २५ एप्रिलपर्यंत आहे. बारामतीसाठी ७ मे, तर उर्वरित तीन मतदारसंघांसाठी १३ मे रोजी मतदान होणार असून, चार जूनला मतमोजणी होणार आहे.

या चारही मतदारसंघांत एकूण ८ हजार २१४ मतदान केंद्र आहेत, तर मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सुमारे ७२ हजार



कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे. त्यांची नियुक्ती करण्याचे काम सध्या सुरू आहे.

### शिरूर मतदारसंघ

- » एकूण मतदार - २५ लाख २७ हजार २४१
- » पुरुष मतदार - १३ लाख ३० हजार १९७
- » महिला मतदार - ११ लाख ९६ हजार ८४४
- » मतदान केंद्रे - २४४२
- » मतदान कधी- १३ मे
- » मतमोजणी- ४ जून

### मावळ मतदारसंघ

- » एकूण मतदार -२५ लाख ९ हजार ४६१
- » पुरुष मतदार - १३ लाख १० हजार ४३४
- » महिला मतदार - ११ लाख ९८ हजार ८६८
- » मतदान केंद्र - २५६२
- » मतदान कधी - १३ मे
- » मतमोजणी - ४ जून

# सुनेला बाहेरची म्हणून हिणवतात!

## आता सीतामाईंबद्दल कळवळा: भाजपची पवारांवर टिका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काल महाविकास आघाडीच्या तिन्ही उमेदवारांनी मोठं शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज सादर केला. शिरूरमधून डॉ. अमोल कोल्हे, बारामतीमधून सुप्रिया सुळे तर पुण्यातून रवींद्र धंगेकर यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी शरद पवारांनी विरोधकांवर सोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर चांगलाच हल्लाबोल केला.**



सत्तेचा उन्माद काय असतो हे राज्यकर्त्यांनी दाखवून दिलं असं म्हणत शरद पवारांनी राज्य सरकारवरही चांगलीच टिका केली. तर राम मंदिरात सीतामाईंची मूर्ती का नाही? असा सवाल देखील पवारांनी केलाय. त्यावर आता भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार केलाय.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राम मंदिरात सीतामाईंची मूर्ती का नाही? असा जावई शोध शरद पवार यांनी लावला आहे. एरवी हेच पवार मंदिराच्या प्रश्नावर नाक मुरडत आपण नास्तिक असल्याची शेखी मिरवत असतात. शरद पवारांनी उचलली जीभ आणि लावली टाळ्याला असं करण्यापूर्वी राम मंदिराची थोडी माहिती घेतली असती तर बरं झालं असतं. राम मंदिरात बालरूपातील रामलल्ला विराजमान आहेत पण पवारांना फक्त राजकारण करण्यात रस आहे. तर सुनेत्रा पवार यांच्यावर केलेल्या अप्रत्यक्ष टिकेवरही बावनकुळेंनी भाष्य केलंय. बरं जे शरद पवार निवडणुकीसाठी घरात आलेल्या सुनेला बाहेरची म्हणून हिणवतात त्यांना आज सीतामाईबद्दल कळवळा येणं म्हणजे ढोंगीपणाचा कळसच म्हणावा लागेल. असा टोलाही बावनकुळेंनी लगावला आहे.

### जमीन आसमानाचा फरक

**» दरम्यान, आज ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी गेली दहा वर्षे या देशातील जनतेची फसवणूक केली. महागाई असो, बेकारी असो, शेतकऱ्यांचे प्रश्न असो, महिलांवरील अत्याचार असो, अनेक गोष्टी आणि यासंदर्भात दिलेली आश्वासने आणि वस्तुस्थिती यांच्यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. साधी गोष्ट आहे, पेट्रोलच्या किंमती. मोदी साहेब २०१४ ला सत्तेवर आले.**

**» त्यावेळेला डॉ. मनमोहन सिंग किंवा मी किंवा आमच्या सहकाऱ्यांनी देशाची सत्ता सोडली. त्यावेळेला पेट्रोलचे भाव ७१ रुपये लिटर होते. मोदींनी आश्वासन दिलं, ५० दिवसांमध्ये मी पेट्रोलच्या किंमती कमी करतो. हे आश्वासन २०१४ मध्ये दिलं होतं. आज ३ हजार ६५० दिवस झाले. ५० टक्के दर कमी होतो, त्यावेळेला अर्थातच १०६ रुपये लिटर झाला. पहिले आश्वासन ७१ च्या ५० टक्के आणि वस्तुस्थिती १०६ रुपये लिटर आजचा भाव आहे. असंही शरद पवारांनी म्हटलंय.**

# ही निवडणुक गावकी-भावकीची नाही

## आढळरावांनी काढला कोल्हेंचा चिमटा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी आपल्या प्रचाराला जोरदार सुरूवात केलीय. यातच प्रचारा दरम्यान नारायणगाव दौऱ्याच्यावेळी त्यांची गावकऱ्यांनी घोड्यावरून मिरवणूक काढली. यावेळी शिवजन्मभूमी पुत्र म्हणून कोल्हेंना लोकसभेत पाठवण्यासाठी ग्रामस्थांनी पाठिंबा दिला. यावरूनच आता आढळरावांनी कोल्हेंचा चिमटा काढला आहे.**



यावेळी आढळराव पाटील म्हणाले की, कोणतीही निवडणुक म्हटली की ती गावकी-भावकीभोवती फिरत असतो. मात्र देशाचा नेता निवडण्याची निवडणूक भावनिक किंवा अन्य पातळ्यांवर होऊ नये. यासाठी काही नेते आग्रही आहेत. निवडून येण्याच्या मेरिटवर जसे तिकीट मिळत आहे. तसेच काम करण्याची क्षमता ओळखून मतदान करण्याचे आवाहन करताना नेते दिसत आहेत. यातूनच ही लोकसभेची निवडणुक गावकी भावकीची नसून देशाच्या भवितव्य ठरवणारी असल्याचे मत आढळरावांनी व्यक्त केलंय.

### मतदान करतांना विचापुर्वक करा

» दरम्यान, आढळराव बोलतांना म्हणाले की, आगामी पाच वर्षाच्या काळात देशाचा नेता हा जागतिक पातळीवर आपल्या देशाला कुठे नेऊन ठेवतो. आपली अर्थव्यवस्था कितव्या क्रमाकांवर येईल याचा विचार करतो. त्यामुळे तुम्ही मतदान करतांना विचापुर्वक करा. कारण ही निवडणुक गावकी भावकीची नाही तर देशाचा पंतप्रधान ठरवण्याची आहे. असेही ते म्हणाले.

# विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सवलत!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

तापमानवाढीमुळे राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्याबाबत सवलत देण्याचा प्रस्ताव प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालकांनी शालेय शिक्षण विभागाला सादर केला होता. या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली असून, येत्या सोमवारपासून (२२ एप्रिल)) विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्याबाबत सवलत मिळणार आहे. शाळेतील उपस्थितीबाबत सवलत देण्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालकांना सूचना दिल्या. गेल्या काही दिवसांपासून राज्यात तापमान वाढले आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहणेपासून सवलत देणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहणेपासून सवलत देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना २२ एप्रिलपासून शाळेत उपस्थित राहण्याबाबत सवलत देण्यात येत आहे.तसेच राज्यातील इतर मंडळांच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास अथवा अशा शाळांमध्ये महत्वाचे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सवलत देण्याच्या अनुषंगाने शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा. या सूचनांचे पालन होण्याबाबतची दक्षता प्राथमिक शिक्षण संचालक, माध्यमिक शिक्षण संचालक यांनी घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.तापमानवाढीमुळे राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्याबाबत सवलत देण्याचा प्रस्ताव प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालकांनी शालेय शिक्षण विभागाला सादर केला होता.

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या सरकारला

# घरी बसविण्यासाठी 'मशाल' पेटवा!

### संजोग वाघेरे पाटील यांचे आवाहन, कर्जत विधानसभेत संवाद मेळावा उत्साहात

। कर्जत । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी बळीराजाचा सहानुभूतीपूर्वक विचार केला. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा धाडसी निर्णय त्यांनी प्राधान्याने घेतला आणि तो तातडीने लागूही केला. परंतु, गद्दारांच्या मदतीने राज्याची सत्ता मिळवलेल्या भाजपच्या केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांनी शेतक-यांना वा-यावर सोडण्याचे काम केले. या सरकारला घरी बसविण्यासाठी मतदान करा आणि मावळ लोकसभेत शिवसेनेची मशाल पेटवा, असे आवाहन महाविकास आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी शुक्रवारी (दि.18) केले.**



महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ कळंभ जिल्हापरिषद, कावोळे व गौर कामत विभागातील नागरिकांशी कडाव येथील श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालय येथे संवाद मेळावा पार पडला. त्या वेळी ते बोलत होते. या मेळाव्याप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस रामशेठ राणे, माजी समाज कल्याण सभापती नारायण डामसे, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, काँग्रेसचे कर्जत तालुका अध्यक्ष संजय गवळी, रायगड जिल्हा महिला आघाडीच्या प्रमुख सुवर्ण जोशी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिनानाथ देशमुख, आपचे डॉ. रियाज पठाण, कळंब ग्रामपंचायत सरपंच प्रमोद कोडलीकर, हुतात्मा पाटील, भाई कोतवाल, पंचायत समितीचे माजी उपसभापती जयवंती हिंदोला, जांमरुखचे सरपंच दत्तूशेठ पिंपरकर, माजी उपसभापती पंढरीनाथ राऊत, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिनानाथ देशमुख, कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तानाजी मते, कर्जत पंचायत समितीचे उपसभापती यशवंत जाधव, माई कोतवाल, हिराजी पाटील, आदिवासी संघटनेचे तालुकाध्यक्ष गोविंद ठोंबरे, महिला तालुका संघटक करुणा बडेकर, माजी पंचायत समिती सदस्य अंजली शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, युवक-युवती यांच्यासह महाआघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

संजोग वाघेरे पाटील पुढे म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणारी भुमिका राज्याचे कुटुंबप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे साहेब यांनी घेतली. शेतकऱ्यांसह सर्व समाज घटकांसाठी ममतेने कामे केली. अनेक योजना लागू केल्या. मात्र, सध्याच्या केंद्र व राज्यातील सरकारला शेतकरी, कामगार, कष्टकरी वर्गाची चिंता नाही. शेतकरी वर्गासाठी ठोस असे काम झाले नाहीत. त्यांच्यासाठी नवीन योजना आणल्या गेल्या नाहीत. शेतकऱ्यांना अक्षरश: वाऱ्यावर सोडण्याचे पाप राज्यातील महायुती सरकारने केले आहे. सर्वसामान्य आणि महिला वर्गाची काहीच चिंता दिसत नाही. देशातील महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. देशासह राज्यात वाढत्या बेरोजगारीने गंभीर रूप धारण केले आहे. बेरोजगार युवक रस्त्यांवर उतरून आंदोलन करीत आहेत. अनेक घटकांकडून रोष व्यक्त केला जात आहे. देश कोठे नेऊन ठेवला आहे, अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. अशा हुकुमशाही आणि जुलमी सरकारला खाली खेचण्यासाठी महाविकास आघाडीला साथ द्यावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

#### 'मशाल' चिन्ह घरोघरी पोहोचले

» पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांनी मावळ लोकसभेतून संजोग वाघेरे पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्या दिवसांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासह महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्षाचे कार्यकर्ते मशाल हे चिन्ह घेऊन गावागावात प्रचार करत आहेत. मशाल चिन्ह घरोघरी आणि प्रत्येकांपर्यंत पोहोचले असून कर्जत विधानसभेतून सर्वाधिक मताधिक्य संजोग वाघेरे पाटील यांना मिळेल, असा विश्वास यावेळी तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी दिला.

---

# उसाचा रस, लिंबू पाणी, कोकम सरबत लय भारी!

### उन्हाळ्याचा तडाखा; स्टॉलधारकांनी शीतपेय विक्रीवर विशेष भर

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवसभर उन्हाची काहिली व उकाड्याचे प्रमाण यामुळे उन्हाचे चटके मोठ्या प्रमाणात जाणवत आहेत. ऊन, प्रचंड उकाडा, घशाला सतत पडणारी कोरड यामुळे शहरात जागोजागी थंडपेयाची मागणी वाढली आहे. यामुळे नागरिक आता शीतपेयाच्या स्टॉलकडे वळू लागले आहेत. परिणामी, स्टॉलधारकांनी शीतपेय विक्रीवर विशेष भर दिल्याचे शहरात दिसून येत आहे.**



उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे नागरिक हैराण होत आहेत. त्यामुळे विविध ठिकाणी थंडपेयांची दुकाने थाटली असल्याचे चित्र दिसून येत आहे. उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी नागरिकांनी ऊसाच्या रस, लिंबू पाणी व कोकम सरबतला अधिक पसंती आहे. सर्व स्टॉलवर दोन्ही पेय हमखास मिळत आहेत. कामानिमित्त येणारे बहुतांश नागरिक उपनगरात गाडीने प्रवास करतात. काही मोक्याच्या ठिकाणी असलेल्या स्टॉलवर मोसंबी, गाजर तसेच इतर फळांचा ज्यूस पिण्यासाठी नागरिक गर्दी करत असल्याचे दिसत आहे. तर बच्चेकंपनी कालाखट्टा, कच्ची कैरी, मिल्क शेक तसेच बर्फाचा गोळा खाण्याचा आनंद घेत असल्याचे चित्र शहरांमध्ये दिसत आहे.

#### विवाह समारंभात ताक, मठ्ठा

सध्या धार्मिक कार्यक्रम, विवाह सोहळे व इतर कार्यक्रमांसाठी बाहेरगावी जाणाऱ्यांनी उसाच्या रसाला पसंती दिली असल्याचे दिसून येत आहे. तापमानामुळे विवाहसमारंभात ताक, मठ्ठा भोजनातील अविभाज्य घटक झाला आहे. दही, तूप, ताक, लोणी आदींची विक्री वाढली आहे.

शीतपेयांकडे नागरिकांची पाठ

नागरिक कोल्ड्रिंक्सला नकार देत ऊस, मोसंबीच्या रसाला ग्राहकांनी पसंती दिली आहे. तापमान वाढले की थंड पेय बनविणाऱ्या विविध देशी विदेशी कंपन्यांची 'चांदी' असते. मात्र, नागरिकांनी या शीतपेयांकडे काहीशी पाठ फिरवल्याचे चित्र विक्रेते अकबर शेख यांनी सांगितले.

#### रसवंतीवर नागरिकांची गर्दी

» शहरात ठिकठिकाणी रसवंतीची दुकाने सुरू झाली आहेत. उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी नागरिकांनी ऊसाच्या रसाला पसंती दिली आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर ऊसाच्या रसाची दुकाने थाटली आहेत. त्यात प्रामुख्याने संत तुकारामनगर, मासुळकर कॉलनी, नेहरूनगर, चिंचवड, उद्योगनगर, आकुर्डी, निगडी आदी परिसरात रसवंतीची दुकाने थाटली आहे. या रसवंतीगृहावर प्रवाशांची गर्दी होत आहे.

"उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे उन्हाळ्यात शहरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते, त्यामुळे शरीराची तहान भागविण्यासाठी लिंबू सरबत, उसाचा रस, सरबत आदींसह दुग्धजन्य थंडपेयांची मागणी वाढली आहे."

**-शीतल गेंगजे, सरबत विक्रेते मोरवाडी.**

# डोके ठिकाणावर ठेवून मतदान करा



## भूमिका

**थोर समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर हे सुमारे शंभर वर्षांपूर्वी म्हणाले होते, ‘राजकारण हा नैतिकता सांभाळून करावयाचा व्यवसाय निश्चितच नाही. तरीही राजकारणासारख्या बदनाम क्षेत्रातही किमान लाज बाळगावी लागते. किमान सभ्यतेने वागावे लागते. या साऱ्या मर्यादा बिनदिक्कत ओलांडणे शक्य नसते.**

भारतात अलीकडे नैतिकता, चारित्र्य, विकास, कार्यकुशलता, बौद्धिक सामर्थ्य या शब्दांचे अर्थ आणि संदर्भ पार बदलले आहेत. सत्ताधारी राजकीय पक्ष तेवढा विकाससन्मुख, नीतिमान, कार्यकुशल, बुद्धिमान असा समज निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नादान राजकारण्यांनी वाचाळपणा आणि लाचारपणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या असताना आणि लोकशाही व्यवस्थेचे सामर्थ्य असणाऱ्या सर्व यंत्रणा कणाहीन करण्याचे प्रयत्न सुरू असताना सुजाण मतदारांना गाफिल राहून चालत नाही, पण सुजाण आणि सजग मतदारांची संख्या कमी होऊन एकाधिकारशाही मानणाऱ्या अंधश्रद्ध भक्तांची संख्या वाढत चालली आहे का?सामाजिक न्याय आणि समता समाजात रुजवणाऱ्या तळाच्या पातळीवरील माणसांना आर्थिक सक्षमतेची वाट दर्शविणारे लोकांचे लोकांकरिता आणि लोकांकडून चालविले जाणारे नीतिमान शासन सुजाण आणि सजग मतदारांना



हवे असणे स्वाभाविक आहे. तथापि अप्रिय वास्तव असे आहे की निवडून आलेल्या सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या वर्तनावर अंकुश ठेवण्याचे सामर्थ्य असणारी लोकशक्ती भारतात अजूनही निर्माण झालेली नाही. परिणामी निर्वाचित लोकप्रतिनिधींचे वर्तन स्वार्थ व सत्ताकांक्षा या प्रेरणांनीच मुख्यत्वे प्रेरित असल्याचे दिसून येते. अलीकडे तर नैतिकता चारित्र्य आणि कार्यकुशलता या शब्दांचे अर्थ सत्ताधारी आणि विशिष्ट राजकीय पक्षात असणे एवढेच उरलेले आहेत. राजकीय सक्षमीकरण न होता नागरिक कट्टरपंथी अंधश्रद्ध होत असल्याने लोकशाहीचा विकास गेल्या काही वर्षांत मंदावला आहे. लोकशाहीविचारांना केंद्रस्थानी ठेवून जनतेचे राजकीयीकरण अजूनही झालेले नसल्याने लोकशाहीत जनतेचा सत्ताधारकांवर जसा अंकुश हवा, तसा भारतात नाही, हे अप्रिय असले तरी खरे आहे.भारतीय राजकारणाचे दोन पैलू : लोकशाही आणि समाजवाद या पुस्तकात एका ठिकाणी ग. प्र. प्रधान लिहितात, ‘आज प्रचंड भांडवलाच्या आधारे भांडवलशाहीचा आक्टोपस भारताभोवती आपले जीवघेणे पाश टाकत आहे. या आक्टोपसच्या नांग्या मोडून टाकणारे जनआंदोलन अद्याप उभे राहू शकलेले नाही, हे कटू सत्य आहे.’ ग. प्र. प्रधान यांनी २००८ मध्ये लिहिलेल्या या वाक्यातील तळमळ आजतागायत कायम आहे. भांडवलवादाच्या आक्टोपसच्या विळख्यात आज भारत पूर्ण जखडला आहे, खासगीकरणाचे जाळे दरदिवशी वाढत चालले आहे, जनआंदोलने आणि संघटनशक्तींचा मात्र अस्त झाला असे वाटण्यासारखी स्थिती आहे का? जनशक्ती संघटित होऊ नये असे प्रयत्न पद्धतशीरपणे केले जात आहेत का? असाही प्रश्न उपस्थित होतो. कालच्या उदास करणाऱ्या सामाजिक वास्तवाचे विश्लेषण करताना ग. प्र. प्रधान लिहितात, ‘मुख्यप्रश्न हा आहे की, भारतातील लोकशाही ही येथील जनतेचे हित साधते की नाही? एकाच वेळी वेगवेगळ्या राजकीय विचारधारांचा प्रभाव भारताच्या लोकशाहीवर होता. आज हा प्रभाव क्षीण झाला असून सत्ता आणि संपत्ती यांची अपवित्र युती झाली आहे.प्राधान्य मिळत असून आर्थिक विषमता अधिकाधिक तीव्र होत आहे.’ सुमारे १६ वर्षांपूर्वीची ही सामाजिक स्थिती आज विकोपाला गेली आहे. मूठभरांच्या आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य दिले जाण्याबाबत तुरळक अपवाद वगळता मोठ्या आवाजात संसदीय सभागृहांत आणि बाहेर विरोध व्यक्त करण्याचेही सामर्थ्य आज दिसत नाही. सानेगुरुजींच्या विचारांचा वसा आणि वारसा आयुष्यभर सांभाळणारे ग. प्र. प्रधान यांच्यासारखे ध्येयनिष्ठ, तत्त्वनिष्ठ, सदाचारी नीतिमान लोकप्रतिनिधी आता भारताच्या राजकारणात दुर्मीळ झाले आहेत, तर दुसरीकडे लोकशाहीचे सामर्थ्य असणाऱ्या मतदारांचे रूपांतर कट्टरपंथी अंधश्रद्ध एकांगी अनुयायांत करण्यात काही राजकीय पक्षांना विलक्षण यश आले आहे.

## संपादकीय »

# शस्त्र उठा लो..!

***आजपासून मतदान सुरू होत असलेल्या यंदाच्या या निवडणुकीचा मुद्दा काय, असा प्रश्न सर्वसामान्य, किमान विचारी जनांस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.***

आव्हान काळातील वर्तनातून व्यक्तीचा खरा स्वभाव दिसून येतो असे म्हणतात. सद्य:स्थितीत निवडणुका हे एक आव्हान. तेव्हा त्यास सामोरे जाणाऱ्या व्यक्तींचे वर्तन पाहिल्यास त्या सर्वांचे अंतरंग, त्यांचा स्वभाव आदींचे ‘खरे’ दर्शन घडते असे म्हणता येईल. या आव्हानवीरांतील कोणी महिला प्रतिस्पर्ध्याविषयी अत्यंत अनुदार उद्गार काढतो. कोणी स्वपक्षीय पुरुष नेत्याचे कोणा महिलेशी कसे संबंध आहेत याच्या सर्वसामान्यांस काहीही देणेघेणे नसलेल्या मुद्द्यांवर बोलतो. एखादा आपला प्रतिस्पर्धी वर्षांच्या कोणत्या कालात शाकाहार/मांसाहार भक्षण करतो यावर टीका करतो. जणू आईन्स्टाईन असल्यागत टीका करतो. कोणी कोणास बांगडया पाठवण्याचे कालबाह्य, अत्यंत प्रतिगामी असे रूपक उदाहरणार्थ वापरतो तर अन्य कोणास मुलींचा घटता जन्मदर पाहून भविष्यात अनेकींस पांचाली व्हावे लागेल अशी चिंता वाटते.

जानेवारी २०२४ पासून एप्रिलच्या मध्यापर्यंत म्हणजे गेल्या साडेतीन महिन्यांत अमेरिकेत गेलेले ११ भारतीय विद्यार्थी विविध घटनांत मृत्युमुखी पडले. अगदी नुकतीच गेल्या शुक्रवारीदेखील कॅनडामध्ये एका भारतीय तरुणाची हत्या झाली. एखाद-दुसरा अपवाद वगळता इतर सर्व मृत्यूंचे कारण अजून अस्पष्ट आहे..

# ‘अमेरिकन ड्रीम’ दु:स्वप्न का ठरत आहे?

परदेशात आणि त्यातूनही अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी जाण्याची ओढ भारतीय विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक आहे. २०२२-२३ मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची आकडेवारी ही या विधानाची निदर्शकच समजायला हवी. या वर्षांत तब्बल २ लाख ६८ हजार ९२३ भारतीय विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिका गाठली. याच्या आदल्या शैक्षणिक वर्षांशी तुलना करता, ही वाढ ३५ टक्के इतकी होती. अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे, असे ‘ओपन डोअर्स’ संस्थेचा अहवाल सांगतो. २०२२-२३ मध्ये अमेरिकेत आलेल्या १० लाख आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी अडीच लाखांहून अधिक म्हणजे २५ टक्के विद्यार्थी हे भारतीय आहेत, असेही ही आकडेवारी सांगते. आकडेवारीचे हे सगळे पुराण सांगण्याचे कारण असे, की या संख्यावाढीला येत्या शैक्षणिक वर्षांत लगाम लागतो की काय, असा



प्रश्न पडावा अशी स्थिती अमेरिकेत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती आणि परिणामी अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण घेऊनही बेरोजगार राहणाऱ्यांची वाढलेली संख्या हे त्याचे एक कारण.

दुसरे कारण अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंबंधी आहे आणि ते अधिक गंभीर आहे. पुन्हा आकडेवारीच्या भाषेत बोलायचे, तर १ जानेवारी २०२४ पासून एप्रिलच्या मध्यापर्यंत म्हणजे साडेतीन महिन्यांत ११ भारतीय विद्यार्थी विविध घटनांत मृत्युमुखी पडले आहेत. अगदी एखाद-दुसरा अपवाद वगळता इतर सर्व मृत्यूंचे कारण अजून अस्पष्ट आहे. अशा प्रकारचे हल्ले वाढले असून, त्यातील काहींची नोंदच न झाल्याची शंका आहे. विद्यार्थी समुदायामध्ये भीतीचे आणि साशंकतेचे वातावरण असल्याच्याही बातम्या आहेत. या सगळया पार्श्वभूमीवर, अमेरिकेत नेमके काय घडते आहे, हा प्रश्न यंदा किंवा पुढच्या वर्षी अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना सतावतो आहे.ही सगळी चर्चा घडण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या घटना नेमक्या काय होत्या, याचा आढावा घेतला, तर या सगळया प्रकाराचे गांभीर्य आणखी नेमकेपणाने समोर येईल. आतापर्यंत झालेल्या घटनांतील अकराही विद्यार्थी पंचविशीच्या आतील आहेत. यात दोघांचा मृत्यू सुरक्षा उपायांची माहिती नसल्याने झाल्याचे समोर आले आहे, पण इतर मृत्यूंबाबत साशंकता आहे. अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांचे बहुतांश मृत्यू हे ओहियो, इलिनॉइस आणि इंडियाना या मध्य-पश्चिमेकडील राज्यांत घडले आहेत, हा या मृत्यूंमधील आणखी एक समान धागा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# निलेश लंके यांना उमेदवारी देऊ नये!

## शरद पवार यांचा नगरच्या सभेत खळबळजनक दावा

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नगर मतदारसंघातून मी निलेश लंके यांना उमेदवारी देऊ नये म्हणून सध्याच्या महसूल मंत्र्यांनी माझ्याकडे मुंबईतील उद्योगपतीला पाठवून, निलेश लंके सोडून दुसरा उमेदवार द्या, अशी विनंती केली होती, असा खळबळजनक गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी आज, शुक्रवारी रात्री नगरमधील जाहीर सभेत बोलताना केला. निलेश लंके यांच्या उमेदवारीमुळे महसूल मंत्र्यांची झोप उडाली म्हणूनच त्यांनीही विनंती केली, असा दावाही पवार यांनी केला.**



महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारासाठी आज नगर शहरातील गांधी मैदानात जाहीर सभा व लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची सांगता सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी शरद पवार यांनी हा गौप्यस्फोट केला. यावेळी विधिमंडळ काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, अंकुश काकडे आदी उपस्थित होते. नगर मतदारसंघातून महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांचे चिरंजीव महायुतीकडून पुन्हा निवडणूक लढवत आहेत. त्यांचे विरोधी उमेदवार महाविकास आघाडीचे निलेश लंके आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी केलेला दावा खळबळजनक ठरत आहे. शरद पवार म्हणाले की, मी त्या उद्योगपतीला विचारले तुमचा आणि विखेंचा संबंध काय तर त्या उद्योगपतीने मला असे संबंध ठेवावेच लागतात, असे उत्तर दिले. विखे यांच्याकडे सत्ता, साधन संपत्ती आहे. परंतु निलेश लंके यांच्यासारखे सर्वसामान्यांचे प्रेम आणि माणुसकी नाही. काही दिवसांपूर्वी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांनी शरद पवार व बाळासाहेब थोरात यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले होते. त्याचा समाचार घेताना शरद पवार म्हणाले की, त्यांच्याकडे माणुसकी शिल्लक नसल्यामुळेच ते वारंवार आमच्यावर टीकाटिपणी करतात. खरेतर सार्वजनिक जीवनात माझी व थोरात यांची त्यांना मदतच झाली आहे. बाळासाहेब विखे यांना जेव्हा खासदार व्हायचे होते, त्यावेळी मी मुख्यमंत्री होतो. परंतु त्यांना भाऊसाहेब थोरात यांच्या विरोधाची भीती वाटत होती. त्यामुळे ते माझ्याकडे आले, मी रात्री एकपर्यंत कामात व्यस्त होतो. त्यानंतर हा प्रश्न माझ्यासमोर आला. मी बाळासाहेब विखे यांना गाडीत घेतले व थोरात यांच्या जोर्वे गावी गेलो. पहाटे ३ वाजता भाऊसाहेब थोरात यांना झोपेतून उठवले. थोरात यांनी विखे यांना माफ केले. झाले गेले विसरून आम्ही तुम्हाला मदत करू असे सांगितले. त्यामुळे बाळासाहेब विखे यांचा लोकसभेचा रस्ता खुला झाला. परंतु माणुसकी नसल्यामुळेच ते आमच्यावर टीकाटिपणी करत आहेत. पूर्वी विखे शिवसेनेत गेले, पुन्हा काँग्रेसमध्ये आले. विरोधी पक्षनेते झाले पुन्हा भाजपत गेले. अशी व्यक्ती आमच्यावर टीकाटीपणी करत आहेत याचे कारण म्हणजे त्यांना निवडणुकीत निवडून येण्याचा आत्मविश्वास नाही, असाही आरोप प शरद पवार यांनी केला.

### तुमचा आणि विखेंचा संबंध काय

» निलेश लंके यांच्या प्रचारासाठी आज नगर शहरातील गांधी मैदानात जाहीर सभा व लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेची सांगता सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी शरद पवार यांनी हा गौप्यस्फोट केला. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, अंकुश काकडे आदी उपस्थित होते. नगर मतदारसंघातून महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांचे चिरंजीव महायुतीकडून पुन्हा निवडणूक लढवत आहेत. त्यांचे विरोधी उमेदवार महाविकास आघाडीचे निलेश लंके आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी केलेला दावा खळबळजनक ठरत आहे. शरद पवार म्हणाले की, मी त्या उद्योगपतीला विचारले तुमचा आणि विखेंचा संबंध काय तर त्या उद्योगपतीने मला असे संबंध ठेवावेच लागतात, असे उत्तर दिले. विखे यांच्याकडे सत्ता, साधन संपत्ती आहे. परंतु निलेश लंके यांच्यासारखे सर्वसामान्यांचे प्रेम आणि माणुसकी नाही.काही दिवसांपूर्वी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांनी शरद पवार व बाळासाहेब थोरात यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले होते.

---

# आज देश विकसित भारताच्या दिशेने जात आहे

## पंतप्रधान मोदी यांची इंडिया आघाडी आणि काँग्रेसवर टीका

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. महायुतीचे वर्ध्याचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज जाहीर सभा पार पडली. यावेळी भाषणाला सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी “रूप पाहता लोचणी सुख झाले वो साजणी...” हा अभंग म्हणाले.**



तसेच ही लोकसभेची निवडणूक विकसित भारत आणि आत्मनिर्भर भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आहे, असे सांगत ‘बारशाला गेला आणि बाराव्याला आला’, असा टोला काँग्रेसला त्यांनी लगावला.. आज देश विकसित भारताच्या दिशेने जात आहे. त्यामध्ये वर्ध्याचीही आशीर्वाद पाहिजे. विकसित भारत आता जास्त लांब नाही. आज संपूर्ण महाराष्ट्र म्हणत आहे की, पुन्हा एकदा मोदी सरकार. २०१४ च्या आधी अशी धारणा बनली होती की, या देशात काही होऊ शकत नाही. सगळीकडे निराशा पसरली होती. खेडे गावापर्यंत वीज पोहोचेल, असे वाटत नव्हते. गरिबांना वाटत होते की आपल्या कितीही पिढ्या गेल्या तरी आपली गरीबी हटणार नाही. शेतकऱ्यांना वाटत होते की कितीही कष्ट केले तरी भाग्य बदलणार नाही. पण आम्ही गेल्या १० वर्षात २५ कोटी कुटुंबांना गरिबीमधून बाहेर काढले आहे. आम्ही गावागावात वीज पोहोचवली. ४ कोटी कुटुंबांना पीएम आवास योजनेचा लाभ दिला.

### बारशाला गेला आणि बाराव्याला आला

» ५० कोटी पेक्षा जास्त लोक बँकेला जोडले”, असे मोदी म्हणाले. आज आत्मविश्वासाने संपूर्ण देश मोदीची गॅरंटी पाहतो आहे. मला सर्वांची सेवा करायची आहे. अशी गॅरंटी द्यायला खूप हिंमत लागते. कितीही अडचणी आल्या तरी मी हे काम करणार आहे. माझ्यासाठी गॅरंटी ही फक्त तीन अक्षरे नाहीत ही जबाबदारी आहे. आता पुढच्या पाच वर्षात ३ कोटी घर आणखी मिळणार आहेत. तसेच ७० वर्षांच्या पुढच्या व्यक्तींसाठी पाच लाखांच्यावरील खर्च मोफत असणार आहे. इंडिया आघाडीची निती कायमच शेतकऱ्यांच्या विरोधी राहिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आवस्था बिकट राहिली. त्यावर मराठीत एक म्हण आहे. बारशाला गेला आणि बाराव्याला आला. काँग्रेसच्या काळात अनेक पिढ्या जात होत्या पण एखादे काम पूर्ण होत नव्हते. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले”, असा टोला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसला लगावला.

# निवडणुकीचे पावित्र्य टिकावे!

## व्हीव्हीपॅट पावत्यांच्या पडताळणीचा निर्णय राखीव

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य टिकले पाहिजे. या प्रक्रियेबाबत लोकांना शंका असतील तर त्या दूर करण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत. तसे प्रयत्न केले गेले नाहीत, असे लोकांना वाटू नये, असे मत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी व्यक्त केले आणि सर्वच्या सर्व (१०० टक्के) व्हीव्हीपॅट पावत्यांच्या पडताळणीबाबतचा निकाल राखून ठेवला.**

खंडपीठाने व्हीव्हीपॅटच्या सर्व कागदी पावत्यांची मोजणी करता येऊ शकेल का, असाही प्रश्न उपस्थित केला. त्यावर, प्रत्येक कागदी पावती मोजणीसाठी नाही. त्यांचा आकारही लहान असून त्या चिकट असल्याने एका व्हीव्हीपॅट यंत्रामधील कागदी पावत्या मोजण्यासाठी पाच तास लागतात, अशी माहिती आयोगाने दिली.सर्व व्हीव्हीपॅट पावत्यांच्या पडताळणीची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. त्यावर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी दिवसभर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने मतदानयंत्र आणि व्हीव्हीपॅट यंत्राच्या कार्यपद्धतीची बारीकसारीक माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाच्या उपायुक्तांकडून घेतली. असोसिएशन ऑफ डेमोक्रेटिक राइट्स (एडीआर) आणि अन्य याचिकाकर्ते तसेच निवडणूक आयोगाचे म्हणणे ऐकून घेतले आणि निकाल राखून ठेवला. मतदानयंत्रे प्रक्रियायंत्र सामग्रीच्या (फर्मवेअर) आधारे काम करतात, यंत्रांमध्ये अपलोड केलेल्या यंत्रणेमध्ये (प्रोग्रॅम) बदल करता येत नाही. मतदानयंत्रांना जोडलेल्या व्हीव्हीपॅट यंत्रामध्ये मेमरी अपलोड केली जाते, त्यामध्येही फेरफार करता येत नाही. शिवाय, व्हीव्हीपॅट यंत्रे तयार करणाऱ्या कंपन्यांना कुठले यंत्र कुठल्या मतदान केंद्रामध्ये पाठवले जाईल आणि कुठल्या बटणाशी कुठले निवडणूक चिन्ह जोडले जाईल याची माहिती नसते, असे स्पष्ट करत निवडणूक आयोगाने मतदानयंत्र आणि व्हीव्हीपॅट यंत्रांमध्ये फेरफाराची शक्यता फेटाळली. मतदानाच्या





सात दिवस आधी उमेदवारांच्या उपस्थितीत ‘व्हीव्हीपॅट’मध्ये निवडणूक चिन्हांच्या प्रतिमा अपलोड केल्या जातात आणि सराव चाचणी घेतली जाते. मतदानाच्या दिवशी दुसऱ्यांदा सराव चाचणी होते. त्यामुळे व्हीव्हीपॅट यंत्रामध्ये फेरफार करणे अशक्य असल्याचे आयोगाने न्यायालयाला सांगितले. लोकसभा निवडणुकीत १७ लाख व्हीव्हीपॅटचा वापर केला जातो. या यंत्रांमध्ये कोणतेही सॉफ्टवेअर नसते. मतदानयंत्रांच्या नियंत्रित व्यवस्थेकडून संदेश दिल्यानंतर व्हीव्हीपॅट यंत्रावरील कागदी पावतीवर चिन्हाची प्रतिमा छापली जाते. व्हीव्हीपॅट यंत्र प्रिंटरसारखे काम करते, अशी माहिती आयोगाने दिली. मतदानयंत्रामधील मतमोजणी आणि ‘व्हीव्हीपॅट’मधील कागदी पावत्यांची एकाचवेळी मोजणी केली तर मतदान प्रक्रियेत फेरफार झाल्याच्या शंकांचे निरसन होईल, असा मुद्दा ‘एडीआर’च्या वतीने वकील प्रशांत भूषण यांनी मांडला होता. मात्र, प्रचंड मतदारसंख्या लक्षात घेता सर्व कागदी पावत्यांची मोजणी करण्याबाबत न्यायालयाने शंका उपस्थित केली होती. त्यावर कागदी पावत्यांच्या मोजणीसाठी मनुष्यबळ वाढवता येऊ शकेल, असा मुद्दा भूषण यांनी मांडला.

मतदारांना ‘व्हीव्हीपॅट’च्या कागदी पावत्या घेऊन जाण्याची मुभा देण्याचा मुद्दाही सुनावणीत उपस्थित केला गेला. मात्र, तसे केल्यास त्या पावत्यांचा कशा प्रकारे गैरवापर केला जाईल हे सांगता येत नाही, असे स्पष्ट करत निवडणूक आयोगाने ही शक्यता फेटाळली. मतदान केल्यानंतर कागदी पावती मतदाराला मतपेटीमध्ये टाकण्याची मुभा द्यावी अशीही मागणी करण्यात आली. मात्र, या लोकसभा निवडणुकीत तरी तसे करता येणार नसल्याने व्हीव्हीपॅट यंत्रावरील कागदी पावती पाहण्यासाठी कायमस्वरूपी दिवा उजळत ठेवण्याचा पर्याय वापरता येऊ शकेल, असाही मुद्दा मांडला गेला.मतदानयंत्रांना जोडलेल्या व्हीव्हीपॅट यंत्रामध्ये मेमरी अपलोड केली जाते. त्यामध्येही फेरफार करता येत नाही. शिवाय, व्हीव्हीपॅट यंत्रे तयार करणाऱ्या कंपन्यांना कुठले यंत्र कुठल्या मतदान केंद्रामध्ये पाठवले जाईल.

### न्यायालय काय म्हणाले?

» केरळमध्ये (मॉक ड्रील) मतदानयंत्रातील मते आणि व्हीव्हीपॅटमधील कागदी पावत्यांतील मतांमध्ये फरक आढळला आणि भाजपला एक जास्त मत पडल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्याची शहानिशा करण्याचा आदेश खंडपीठाने दिला होता. आत्तापर्यंत एकदाही मतदानयंत्र आणि कागदी पावत्यांमध्ये अनियमितता आढळलेली नाही. त्यावरून या प्रक्रियेची विश्वासार्हता स्पष्ट होते असेही आयोगाने सांगितले.खंडपीठाने व्हीव्हीपॅटच्या सर्व कागदी पावत्यांची मोजणी करता येऊ शकेल का, असाही प्रश्न उपस्थित केला. त्यावर, प्रत्येक कागदी पावती मोजणीसाठी नाही. त्यांचा आकारही लहान असून त्या चिकट असल्याने एका व्हीव्हीपॅट यंत्रामधील कागदी पावत्या मोजण्यासाठी पाच तास लागतात, अशी माहिती आयोगाने दिली.सर्व व्हीव्हीपॅट पावत्यांच्या पडताळणीची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. त्यावर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी दिवसभर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने मतदानयंत्र आणि व्हीव्हीपॅट यंत्राच्या कार्यपद्धतीची बारीकसारीक माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाच्या उपायुक्तांकडून घेतली.

# हिरेमठ हत्या प्रकरण लव्ह जिहादचे असल्याचा आरोप

## नेहा हिरेमठचा पाठलाग करून फयाजने तिच्यावर सपासप वार केले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्नाटकच्या हुबळी-धारवाड महानगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे नगरसेवक निरंजन हिरेमठ यांच्या नेहा हिरेमठ या मुलीचा तिच्याच महाविद्यालयात दिवसाढवळ्या निर्घृण खून करण्यात आला. खून करणारा हा त्याच महाविद्यालयातील विद्यार्थी असून त्याला काही तासातच पोलिसांनी अटकही केली.**

मात्र या हत्येनंतर हुबळीमधील राजकारण तापले आहे. नेहाचा खून करणारा आरोपीचे नाव फयाज असल्यामुळे भाजपाने या मुद्दयावर राज्यातील काँग्रेस सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने कालपासून (दि. १८ एप्रिल) महाविद्यालय परिसरात तीव्र निषेध आंदोलन छेडले असून हा लव्ह जिहादचा प्रकार असल्याचा आरोप केला. नेहा हिरेमठ ही २३ वर्षीय विद्यार्थीनी हुबळीच्या बीव्हीबी महाविद्यालयात मास्टर ऑफ कम्प्युटर ॲप्लिकेशन्स (MCA) चे शिक्षण घेत होती. याच महाविद्यालयाच्या आवारात फयाजने नेहाची हत्या केली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात सदर गुन्हा कैद झाल्यामुळे त्याची दाहकता सर्वांसमोर आली. नेहाचा पाठलाग करून तिच्यावर सपासप वार केल्यामुळे नेहाचा घटनास्थळीच





दुर्दैवी मृत्यू झाला. पोलिसांनीही नेहावर अनेक वार झाले, ज्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे मान्य केले आहे. हत्या करून पळ काढणाऱ्या फयाजला स्थानिकांच्या मदतीने तासाभरातच अटक करण्यात आली.नेहाचे वडील आणि काँग्रेसचे नगरसेवक निरंजन हिरेमठ यांनी सांगितले की, फयाजला ते ओळखत होते. त्याने नेहाचा नाद सोडून द्यावा, तिचा पाठलाग करू नये, असे त्याला बजावण्यात आले होते, असे सांगितले. हिरेमठ पुढे म्हणाले, “फयाजने नेहावर त्याचे प्रेम व्यक्त केले होते. मात्र नेहाने फयाजला स्पष्ट नकार दिला होता. तिला तो अजिबात आवडत नव्हता. नेहा अशा गोष्टींपासून नेहमीच दूर राहण्याचा प्रयत्न करत होती. नेहाने फयाजचा प्रस्ताव तर नाकारलाच शिवाय आपण वेगवेगळ्या समाजातून येतो, त्यामुळे त्याच्याशी कुठल्याही प्रकारचे संबंध ठेवायचे नाहीत, असेही तिने स्पष्ट केले होते. मात्र तरीही फयाजने माझ्या मुलीचा बळी घेतला.”निरंजन हिरेमठ एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले की, प्रेमाला नकार दिल्यामुळे आरोपीने हे कृत्य केले आहे. याआधी आम्ही आरोपीशी चर्चा केली होती. आम्ही हिंदू आहोत, तुझे कुटुंब मुस्लीम धर्मीय आहे. त्यामुळे या नात्याला आम्ही परवानगी देऊ शकत नाही, असे आम्ही त्याला स्पष्ट सांगितले होते.भाजपाने मात्र हे प्रकरण लव्ह जिहादचे असल्याचा आरोप केला आहे.

### दोघांमध्येही प्रेमसंबंध होते ?

» दरम्यान काँग्रेस सरकारने भाजपाचा आरोप फेटाळून लावला आहे. राज्याचे गृहमंत्री जी. परमेश्वर म्हणाले की, नेहा आणि फयाज या दोघांमध्येही प्रेमसंबंध होते. कदाचित नेहा दुसऱ्याबरोबर लग्न करणार असल्याचा राग मनात धरून फयाजने टोकाचे पाऊल उचलले असावे. या प्रकरणातील सर्व माहिती अद्याप माझ्यापर्यंत आलेली नाही. मात्र दोघांमध्येही प्रेमसंबंध असल्यामुळे हे लव्ह जिहादचे प्रकरण होत नाही.

# संपत्ती जप्त केल्यावर राज कुंद्राची पोस्ट




गुरुवारी शिल्पा शेट्टी व तिचा पती राज कुंद्रा यांची ९७.७९ कोटी रुपयांची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे. पॉन्झी घोटाळ्याप्रकरणी ही कारवाई ईडीकडून करण्यात आली. याबाबत शिल्पा किंवा राजने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. पण राज कुंद्राने सोशल मीडियावर शेअर केलेली स्टोरी चर्चेत आली आहे. गुरुवारी ईडीने शिल्पा शेट्टी व तिचा पती राज कुंद्रा यांची ९७.७९ कोटी रुपयांची स्थावर आणि जंगम मालमत्ता तात्पुरती जप्त केली. मनी लाँडरिंग प्रकरणात ही कारवाई करण्यात आली. शिल्पा शेट्टीच्या नावावर असलेला फ्लॅट शिल्पा व राज यांचा पुण्यातील बंगला व राज कुंद्राच्या नावावर असलेले इक्विटी शेअर्स ईडीकडून जप्त करण्यात आले. याचदरम्यान आता राज कुंद्राच्या इन्स्टाग्राम स्टोरीने लक्ष वेधून घेतलं आहे.राज कुंद्राने डरकाळी फोडणाऱ्या सिंहाचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. त्यावर “जेव्हा तुम्हाला अपमानित वाटत असतं, तेव्हा शांत राहायला शिकणं ही वेगळ्या प्रकारची प्रगती (ग्रोथ) आहे,” असं लिहिलं आहे.

ईडीने केलेल्या कारवाईसंदर्भात अद्याप शिल्पा किंवा राजने प्रतिक्रिया दिलेली नाही, पण राजच्या या इन्स्टाग्राम स्टोरीची चर्चा होताना दिसत आहे.दरम्यान, ईडीने शिल्पा व राजच्या संपत्तीवर जप्तीची कारवाई केल्यानंतर अभिनेत्री सलमान खानच्या घरी गेली होती. गुरुवारी सलमान खानच्या घरी जातानाचे शिल्पा व तिच्या आईचे व्हिडीओ समोर आले होते. सलमान खानच्या घरावर रविवारी गोळीबार झाला होता, त्यानिमित्ताने त्याची भेट घेण्यासाठी शिल्पा वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील अभिनेत्याच्या घरी गेली होती. गुरुवारी शिल्पा शेट्टी व तिचा पती राज कुंद्रा यांची ९७.७९ कोटी रुपयांची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे. पॉन्झी घोटाळ्याप्रकरणी ही कारवाई ईडीकडून करण्यात आली. याबाबत शिल्पा किंवा राजने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. पण राज कुंद्राने सोशल मीडियावर शेअर केलेली स्टोरी चर्चेत आली आहे.

# सलमान खानने पहिल्यांदाच सोडली मुंबई

अभिनेता सलमान खानच्या घरावर रविवारी (१४ एप्रिल रोजी) पहाटे गोळीबार झाला. दुचाकीवर आलेल्या दोन हल्लेखोरांनी अभिनेत्याच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर पाच राउंड गोळीबार केला. या घटनेनंतर अभिनेत्याच्या घराबाहेर सुरक्षा वाढविण्यात आली. तसेच त्याच्या घरावर गोळ्या झाडणाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर आता अभिनेता विदेशात रवाना झाला आहे. अभिनेता सलमान खान नुकताच विमानतळावर दिसला. तो दुबईला गेला आहे. एका कार्यक्रमासाठी दुबईला गेला आहे. सोशल मीडियावर त्याचे काही फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. अभिनेता विमानतळावर येण्याआधी त्याचा बॉडीगार्ड शेरा आला आणि सलमानची वाट पाहत थांबला, त्यानंतर सलमान आला आणि तो दुबईला गेला आहे.रविवारी झालेल्या गोळीबारानंतर सलमान खान एकदा सुरक्षारक्षकांसह घराबाहेर पडला होता, पण काही वेळातच तो परत आला होता. त्यानंतर आज तो पहिल्यांदाच प्रवास करतोय. तो एका लक्झरी प्रोजेक्टच्या उद्घाटनासाठी दुबईला गेला आहे.दरम्यान, सलमान खानच्या घरावर गोळीबार करणारे आरोपी सागर पाल व विकी गुप्ता यांना सोमवारी गुजरातमधील भुज येथून अटक करण्यात आली होती. नंतर न्यायालयात हजर केल्यावर त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या पोलीस या प्रकरणात सहभागी इतर आरोपींचा शोध घेत आहेत.अभिनेता सलमान खानच्या घरावर रविवारी (१४ एप्रिल रोजी) पहाटे गोळीबार झाला. दुचाकीवर आलेल्या दोन हल्लेखोरांनी अभिनेत्याच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर पाच राउंड गोळीबार केला. या घटनेनंतर अभिनेत्याच्या घराबाहेर सुरक्षा वाढविण्यात आली. तसेच त्याच्या घरावर गोळ्या झाडणाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर आता अभिनेता विदेशात रवाना झाला आहे. अभिनेता सलमान खान नुकताच विमानतळावर दिसला. तो दुबईला गेला आहे. एका कार्यक्रमासाठी दुबईला गेला आहे. सोशल मीडियावर त्याचे काही फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. अभिनेता विमानतळावर येण्याआधी त्याचा बॉडीगार्ड शेरा आला आणि सलमानची वाट पाहत थांबला, त्यानंतर सलमान आला आणि तो दुबईला गेला आहे. रविवारी झालेल्या गोळीबारानंतर सलमान खान एकदा सुरक्षारक्षकांसह घराबाहेर पडला होता, पण काही वेळातच तो परत आला होता. त्यानंतर आज तो पहिल्यांदाच प्रवास करतोय. तो एका लक्झरी प्रोजेक्टच्या उद्घाटनासाठी दुबईला गेला आहे.



# जान्हवी कपूरचा ‘उलझ’

धडक’ चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी श्रीदेवींची मुलगी अभिनेत्री जान्हवी कपूर विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. तिने अल्पावधीत आपल्या अभिनयाने बॉलीवूडमध्ये एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. आता एका दमदार भूमिकेत जान्हवी कपूर प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. ‘उलझ’ असं तिच्या आगामी चित्रपटाचं नाव असून नुकताच चित्रपटाचा जबरदस्त टीझर प्रदर्शित झाला आहे. गेल्या वर्षभरापासून जान्हवी कपूर ‘उलझ’ चित्रपटाच्या चित्रीकरणासंदर्भात अपडेट देत होती. चित्रपटाचं चित्रीकरण संपल्यानंतर तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती. आता तिच्या ‘उलझ’ चित्रपटाच्या टीझरसह प्रदर्शनाची तारीख समोर आली आहे.उलझ’ या चित्रपटात जान्हवी कपूरने भारतीय वन सेवा अधिकारीच्या (इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस ऑफिसर -IFS) भूमिकेत पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाची कथा देशभक्तीवर आधारित असून तरुण मुत्सद्दी सुहानाच्या (जान्हवी कपूर) भोवती फिरणारी कथा आहे. ‘उलझ’ चित्रपटात सुहाना देश आणि तिच्या विरोधात रचलेल्या कट उधळवताना पाहायला मिळणार आहे.जान्हवीच्या या आगामी चित्रपटाचा टीझर सस्पेन्स आणि थ्रिलरने भरलेला आहे. टीझरची सुरुवात ‘सारे जहाँ से अच्छा’ गाण्याच्या म्युझिकने होते. त्यानंतर जान्हवीच्या एका संवादने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. “गद्दारी केल्याचा बदला फक्त प्राणाने घेतला जाऊ शकतो. प्राण देऊन किंवा प्राण घेऊन,” असं जान्हवी कपूर म्हणताना दिसत आहे.

# भावाच्या सासऱ्यांसाठी रितेश देशमुखची पोस्ट

प्रसिद्ध चित्रपट निर्माते वाशू भगनानी यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रितेश देशमुखने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर केली आहे. रितेश व वाशू भगनानी हे एकाच क्षेत्रातील असले तरी या दोघांचं कौटुंबीक नातं आहे. रितेशने शेअर केलेल्या स्टोरीने लक्ष वेधलं आहे. वाशू भगनानी हे रितेश देशमुखच्या भावाचे सासरे आहेत. लातुर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख हे वाशू भगनानी यांचे जावई आहेत. रितेश देशमुखची वहिनी दिपशिखा देशमुख पूजा व वाशू यांची मोठी मुलगी आहे. दिपशिखा जॅकी भगनानीची मोठी बहीण आहे. वाशू भगनानी यांच्या वाढदिवसानिमित्त रितेशने त्यांच्याबरोबरचा एक फोटो पोस्ट करत शुभेच्छा दिल्या आहेत.रितेश देशमुखची भगनानी व रकुल प्रीतशी मैत्री आहे. फेब्रुवारीत



# अक्षय -टायगरच्या नावावर आणखी एक फ्लॉप

अक्षय कुमार व टायगर श्रॉफ यांच्या मुख्य भूमिका असलेला ॲक्शन थ्रिलर चित्रपट ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ ईदच्या दिवशी प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई करेल, अशी अपेक्षा निर्मात्यांना होता. पहिल्या दोन दिवसांची कमाई पाहता चित्रपट सुपरहिट होईल, असं वाटलं होतं. पण नंतर मात्र या चित्रपटाच्या कमाईत सातत्याने घट झाली आणि आता आठ दिवसांनी चित्रपटाला प्रेक्षक मिळत नसल्याची परिस्थिती आहे. ‘बडे मियाँ छोटे मियाँ’चं कलाकारांनी जोरदार प्रमोशन केलं होतं, पण थिएटरमध्ये रिलीज झाल्यानंतर अक्षय-टायगरचा ॲक्शन थ्रिलर प्रेक्षकांची मनं जिंकू शकला नाही. त्यामुळे हा चित्रपट कमाईच्या बाबतीत खूपच मागे पडला आहे. हा चित्रपट प्रदर्शित होऊन एक आठवडा झाला आहे, पण तो बजेटच्या निम्मीही कमाई करू शकला नाही. आता चित्रपटाच्या आठव्या दिवसाच्या कमाईचे प्रारंभिक आकडे समोर आले आहेत.‘सॅकनिल्क’ च्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ ने रिलीजच्या आठव्या दिवशी १.६० कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाचं एकूण कलेक्शन आता ५०.१५ कोटी रुपये झालं आहे. चित्रपटाने पहिल्या दिवशी १५.६५ कोटी रुपये, दुसऱ्या दिवशी ७.६ कोटी, तिसऱ्या दिवशी ८.५ कोटी, चौथ्या दिवशी ९.०५ कोटी, पाचव्या दिवशी २.५ कोटी, सहाव्या दिवशी २.४ कोटी, सातव्या दिवशी २.५५ कोटी, आठव्या दिवशी १.६० कोटी रुपयांची कमाई केली.

# राहुल-क्विंटन चेन्नईला पडले भारी!

## राहुल, डीकॉकची पहिल्या विकेटसाठी 127 धावांची भागीदारी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**लखनौने कर्णधार केएल राहुल आणि क्विंटनच्या भागीदारीच्या जोरावर चेन्नईवर ८ विकेट्सने आणि १ षटकार राखून दणदणीत विजय मिळवला. केएल राहुल आणि क्विंटन डीकॉकच्या १०० अधिक भागीदारीच्या जोरावर लखनऊने विजयाचा पाया रचला. चेन्नईने दिलेल्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना एलएसजीच्या सलामीवीरांनी १५ षटकांपर्यंत एकही विकेट न गमावता दमदार फलंदाजी केली. केएल राहुल आणि क्विंटन डीकॉकने पहिल्या विकेटसाठी १२७ धावांची विक्रमी भागीदारी केली.**



क्विंटन डीकॉकने बाद होण्यापूर्वी ४३ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ५४ धावा केल्या. डीकॉकला १५व्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर मुस्तफिजूरने धोनीकडून झेलबाद केले. तर केएल राहुल १८व्या षटकातील पहिल्या चेंडूवर झेलबाद झाला. पाथिरानाने टाकलेल्या चेंडूवर केएलने एक चांगला फटका खेळला पण सर्वात्कृष्ट क्षेत्ररक्षक जडेजा तिथे तैनात होता आणि त्याने हवेचत झेप घेत शानदार झेल टिपला. राहुल वादळी खेळी करत ५३ चेंडूत ३ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने ८२ धावा केल्या. दोन्ही सलामीवीर बाद झाल्यानंतर निकोलस पुरन आणि मार्कस स्टॉयनिस यांनी संघाला विजय मिळवून दिला.दोन्ही सलामीवीर बाद झाल्यानंतर निकोलस पुरन आणि मार्कस स्टॉयनिस यांनी संघाला विजय मिळवून दिला. पुरनने २३ चेंडूत १ षटकार आण ३ चौकारांसह २३ धावा करत नाबाद राहिला तर स्टॉयनिस ७ चेंडूत १ चौकार लगावत ८ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी नाणेफेक जिंकत लखनौने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय संघाच्या चांगलाच पथ्यावर पडला. चेन्नईला लखनऊच्या गोलंदाजांनी एकामागून एक धक्के दिले. सलामीवीर रचिन रवींद्रला मोहसिन खानने क्लीन बोल्ड करत गोल्डन डकवर बाद केले. गायकवाड आणि रहाणेने संघाचा डाव सावरला, पण ऋतुराज १७ धावा करत यश ठाकूरच्या चेंडूवर बाद झाला. अजिंक्य रहाणे चांगल्या लयीत होता पण तोही क्रुणाल पंड्याच्या गोलंदाजीवर २४ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ३६ धावा केल्या. तर जडेजा एकटाच मैदानात शेवटपर्यंत पाय रोवून उभा होता. जडेजाने ४० चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ५७ धावा केल्या. शिवम दुबे आणि समीर रिझवी स्वस्तात बाद होऊन परतले. तर अनुभवी मोईन अलीने ३ षटकारांच्या हॅटट्रिकसह ३० धावा दिल्या. तर धोनीने अखेरच्या षटकांमध्ये धावांचा पाऊस पाडत ९ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह २८ धावा केल्या आणि संघाची धावसंख्या १७६ वर नेली. लखनौकडून क्रुणाल पंड्याने सर्वाधिक २ विकेट तर स्टॉयनिस, रवी बिश्नोई, यश ठाकूर आणि मोहसिन खान यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.क्विंटन डीकॉकने बाद होण्यापूर्वी ४३ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीने ५४ धावा केल्या. डीकॉकला १५व्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर मुस्तफिजूरने धोनीकडून झेलबाद केले. तर केएल राहुल १८व्या षटकातील पहिल्या चेंडूवर झेलबाद झाला. पाथिरानाने टाकलेल्या चेंडूवर केएलने एक चांगला फटका खेळला.

### पुरन 23 चेंडूत 23 धावा करत नाबाद

» जडेजा तिथे तैनात होता आणि त्याने हवेचत झेप घेत शानदार झेल टिपला. राहुल वादळी खेळी करत ५३ चेंडूत ३ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने ८२ धावा केल्या. दोन्ही सलामीवीर बाद झाल्यानंतर निकोलस पुरन आणि मार्कस स्टॉयनिस यांनी संघाला विजय मिळवून दिला.दोन्ही सलामीवीर बाद झाल्यानंतर निकोलस पुरन आणि मार्कस स्टॉयनिस यांनी संघाला विजय मिळवून दिला. पुरनने २३ चेंडूत १ षटकार आण ३ चौकारांसह २३ धावा करत नाबाद राहिला तर स्टॉयनिस ७ चेंडूत १ चौकार लगावत ८ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी नाणेफेक जिंकत लखनौने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय संघाच्या चांगलाच पथ्यावर पडला.

# महेंद्रसिंग धोनीची वादळी फलंदाजी कायम आहे

## संपूर्ण कारकिर्दीत माहीने पहिल्यांदाच लगावला भन्नाट शॉट

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएलमध्ये अखेरच्या षटकांमध्ये धोनीची वादळी फलंदाजी कायम आहे. धोनी अखेरच्या षटकांमध्ये मैदानावर येणार म्हणजे गोलंदाजांची धुलाई होणार हे जणू निश्चित झालंय. लखनऊ सुपर जायंट्स विरुद्धच्या सामन्यात फलंदाजीला आलेल्या धोनीने पुन्हा एकदा अशीच विस्फोटक फलंदाजी केली. धोनीने २८ धावांच्या खेळीमध्ये एक असा षटकार ठोकला जो त्याच्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत क्वचितच कोणी पाहिला असेल.**



या शॉटचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. डावाच्या १७व्या षटकात फलंदाजीला आलेल्या धोनीने एकेरी धाव घेत आपले खाते उघडले आणि तिसऱ्या चेंडूवर चौकार मारला. पुढच्याच चेंडूवर त्याने कारकिर्दीत पहिल्यांदाच असा शॉट खेळला, जो पाहून एकना स्टेडियममध्ये बसलेल्या प्रत्येकाने एकच जल्लोष केला. डावाचे १९वे षटक टाकणाऱ्या मोहसिन खानच्या तिसऱ्या चेंडूवर त्याने विकेट सोडून डाव्या बाजूला जात यष्टीच्या मागे षटकार लगावला. मोहसिनच्या या शॉर्ट लेन्थ बॉलवर धोनीने ऑफ साईडला जाऊन यष्टिरक्षक केएल राहुलच्या डोक्यावरून एक असा फटका लगावला जो थेट षटकारासाठी गेला. धोनीने त्याच्या संपूर्ण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत क्वचितच असा शॉट खेळला असेल. हा शॉट पाहून फक्त चाहतेच नाही तर कॉमेंटेटर यांनीही धोनीच्या या शॉटची प्रशंसा केली आणि त्यांनी धोनीने असा शॉट पहिल्यांदाच खेळला असल्याचा उल्लेख केला. ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.माहीने या सामन्यात ३११ च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. त्याने स्फोटक फलंदाजी करत केवळ ९ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २८ धावा केल्या. तर धोनीने त्याच्या या षटकारांच्या पावसामध्ये १०१ मीटर लांब षटकार लगावला. चेन्नई सुपर किंग्सने आजच्या दिवशी म्हणजे १९ एप्रिल २००८ रोजी आयपीएलमधील पहिला सामना जिंकला होता. याच खास दिवशी धोनीने शानदार फटकेबाजी करत हा दिवस अधिक संस्मरणीय केला आहे.धोनीच्या या शानदार फटकेबाजीच्या जोरावर झटपट विकेट गमावलेल्या चेन्नईने ६ बाद १७६ धावा केल्या. जडेजाची ५७ धावांची खेळी, मोईन अलीच्या ३० धावा आणि रहाणेच्या ३६ धावांच्या खेळीने संघाला १०० धावांचा आकडा गाठण्यात मदत केली.

### अखेरच्या षटकांमध्ये तुफान फटकेबाजी

» संघाने सुरूवातीला झटपट विकेट्स गमावल्याने संघ १५० धावांपर्यंत क्वचितच पोहोचेल असे वाटले होते. पण धोनीने पुन्हा एकदा अखेरच्या षटकांमध्ये तुफान फटकेबाजी करत संघाला चांगली धावसंख्या उभारण्यात मोठी भूमिका बजावली. आयपीएलमध्ये अखेरच्या षटकांमध्ये धोनीची वादळी फलंदाजी कायम आहे. धोनी अखेरच्या षटकांमध्ये मैदानावर येणार म्हणजे गोलंदाजांची धुलाई होणार हे जणू निश्चित झालंय.